महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. करोना विषाणूच्या अनुषंगाने उपाययोजनांचा भाग म्हणून या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 15 एप्रिल, 2020 व 17 एप्रिल, 2020
6. भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील आदेश क्रमांक 40-3/2020/डीएम-आय (ए) दिनांक 15 एप्रिल, 2020
7. प्रधान सचिव, पणन यांचेकडील दिनांक 17 एप्रिल, 2020 रोजीचे पत्र
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील पुरवणी आदेश क्र डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 18 एप्रिल, 2020
9. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 2 मे, 2020

---0000---

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 185 दिनांक 03 मे, 2020

## फौजदार प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 अन्वये आदेश

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने करोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केलेला आहे. तसेच करोना विषाणूचा प्रसार भारतात , महाराष्ट्रात गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे, यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे आणि सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमांचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याचे शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक परिस्थिती निर्माण होत असल्याने, त्याकरीता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि अशी उपाययोजना फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 च्या तरतूदींच्या अनुषंगाने जनतेस, संबंधित आस्थापना यांना उद्देशून काढणे आवश्यक असल्याबाबत माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 02 मे, 2020 अन्वये लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 04 मे, 2020 पासून दिनांक 17 मे, 2020 पावेतो वाढविण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, मी. **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जळगांव** मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी

Scanned by CamScanner

प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून संपूर्ण जळगांव जिल्हयात **दिनांक 04/05/2020 रोजी रात्री 00.01 वाजे पासून ते दिनांक 17/05/2020 रोजीच्या 00.00 वाजे पावेतो** फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 चे आदेश पुढील प्रमाणे आदेश लागू करीत आहे.

1) जळगांव जिल्हयात नमूद कालावधीत कोणतीही व्यक्ती / नागरीक यांना **सायंकाळी 07.00 ते सकाळी 07.00 वाजेपावेतो** अत्यावश्यक बाब वगळता, अनावश्यकरीत्या फिरण्यास, मुक्तपणे संचार करण्यास मनाई असेल. (आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित यंत्रणा व अत्यावश्यक सेवा वगळता)

2) 65 वर्षावरील जेष्ठ नागरीक, गर्भवती महिला, 10 वर्षाखालील बालके, गंभीर आजार असलेल्या व्यक्ती यांनी घरीच रहावे. तथापि अत्यावश्यक सेवा, वैद्यकीय सेवा घेण्याकरीता संबंधितांना मुभा असेल.

3) जळगांव जिल्हयातील घेण्यात येणा-या सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, राजकीय कार्यक्रम, जत्रा, यात्रा, उरुस, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनाचे कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा व सर्व आठवडे बाजार भरण्यास बंदी घालण्यात येत आहे.

4) जळगांव जिल्हयात कोणतीही व्यक्ती / नागरीक यांना सार्वजनिक ठिकाणी चेह-यावर मास्क लावणे बंधनकारक राहील. तसेच उघडयाव अथवा सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास बंदी राहील. तथापी सदरील बाबींचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर नमूद कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश हा सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्यामुळे एकतर्फी पारीत करण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा आज दिनांक 03 मे, 2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

(डॉ. अविनाश ढाकणे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपवनसंरक्षक,जळगांव वन विभाग,जळगावं
5. उपवनसंरक्षक, यावल वन विभाग,जळगांव
6. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
7. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
8. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
9. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
10. उप जिल्हाधिकारी रोहयो.जळगांव
11. जिल्हा कोषागार अधिकारी,जळगांव
12. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
13. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
14. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
15. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
16. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
17. सहायक कामगार आयुक्त,जळगांव
18. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
19. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,जळगांव
20. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव
21. उप अभियंता, एम.आय.डी.सी.जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner